## काळजी

फाटे धरणीचा ऊर
वाटे क्षितिजा काळजी
उजाड माळरानाची
नाही माणसा काळजी
ओढा झाला गाववेश
त्याला गटाराचे पाणी
मनी वाढे प्रदूषण
माणूस हा निष्काळजी
नाही भरवसा कोणा
नाती तुटाळच झाली
कसे रुजवावे प्रेम
करी वाडा हा काळजी
लागे प्रेमाला ओहोटी
रोज नवा नवा वाद
शाखा गेल्या दूर दूर
लागे मुळांना काळजी

**- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**

-------------------